जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७७२ दिनांक - ३०/१०/२०२३**

सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा पुणे शहर

## सीकींग ॲडव्हेंचर या डेटींग ॲपद्वारे ग्राहकांना आकर्षीत करून त्यांना लुटमार करून जबरी चोरी करणारे परप्रांतीय एक महिला व एक पुरूष असे दोन आरोपी सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी ताब्यात घेतले

पुणे शहरातील,महाराष्ट्र राज्यातील व इतर राज्यातील लोकांना सीकींग ॲडव्हेंचर या डेटींग ॲपद्वारे आकर्षीत करून व चॅटींग करून त्यांना मोबाईलवर मुलीचे फोटो पाठवुन हॉटेल बुक करावयाला लावुन हॉटेल बुक केल्यावर ग्राहकाकडून ठरलेली रक्कम ऑनलाईन घेवुन तसेच त्या व्यतिरिक्त ग्राहकांना दमदाटी मारहाण करून जबरदस्तीने आणखी जास्तीची रक्कम ऑनलाईनद्वारे घेवुन तसेच ग्राहकाकडील मौल्यवान चिज वस्तु, सोन्याचे दागिणे जबरदस्तीने जबरी चोरी करून लुटुन नेणारे अनोळखी एक पुरूष व अनोळखी एक महिला यांचे विरूध्द चंदननगर पोलीस स्टेशन येथे गुरनं ५०२/२०२३ भादवि ३९४, ५०६,३४ व आयटी ॲक्ट ६६ अ,६६ ब अन्वये दाखल असलेल्या गुन्हयाचा मा.वरीष्ठांचे आदेशाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष व सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा यांचे मार्फत समांतर तपास सुरू असताना नमुद आरोपी हे त्यांची ओळख लपवुन सदरचे गुन्हे करीत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी वापरलेले विविध इलेक्ट्रानिक गॅझेटचे तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करून सदर गुन्हयातील एक महिला वय २७ वर्षे (उत्तराखंड) व एक पुरुष वय २५ वर्षे (दिल्ली) असे दोन आरोपींना तुर्भे (नवी मुंबई) येथुन ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे अधिक तपास करता सदरचा गुन्हा हा त्यांनीच केला असल्याचे निष्पन्न झाले असल्याने सदर दोन्ही आरोपीना पुढील कायदेशीर कारवाई कामी चंदननगर पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर आरोपीकडे केलेल्या प्राथमिक तपासात त्यांनी पुणे शहर तसेच इतर राज्यातील महत्वाच्या शहरामध्ये नामांकित हॉटेल मध्ये ग्राहकांना रूम बुक करण्यास सांगुन त्यांचेकडून देखील जबरी चोरी केली असल्याचे माहिती मिळत आहे.असा प्रकार इतर कोणाबरोबर घडला असल्यास त्याव्यक्तीने त्याबाबतची माहिती सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे,शाखा पुणे शहर यांचेकडे देणेबाबत अवाहन केले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे पुणे शहर श्री.अमोल झेंडे, यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सामाजिक सुरक्षा विभागाचे श्री.भरत जाधव तसेच, सपोनि राजेश माळेगावे, स.पो.फौज.राजेंद्र कुमावत, पोलीस अंमलदार मनिषा पुकाळे,तुषार भिवरकर,सागर केकाण,इम्रान नदाफ,या पथकाने यशस्वी केली आहे.